दैनिक लोकशाही
जळगाव next
३ | जळगाव, मंगळवार, दि.३ नोव्हेंबर २०२६ | epaper.lokshahilive.com

युवारंगमध्ये दिव्यांग विभागात निशा बारीला तीन रौप्य

लोकशाही न्यूज नेटवर्क
शेंदुर्णी ता. जामनेर ✍ प्रतिनिधी

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे जळगाव येथे आयोजित आंतरमहाविद्यालयीन युवक व दिव्यांग महोत्सव 'युवारंग २०२६' मध्ये रघुनाथराव भाऊराव गरुड कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने तीन रौप्यपदके पटकावली. या महोत्सवातील दिव्यांग विभागात महाविद्यालयाची विद्यार्थिनी निशा ज्ञानेश्वर



बारी हिने क्ले मॉडेलिंग, कार्टूनिंग आणि स्पॉट पेंटिंग या तीन ललित कला प्रकारांत उल्लेखनीय कामगिरी करत प्रत्येकी एक रौप्यपदक मिळविले. संघव्यवस्थापक म्हणून विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. सुजाता पाटील आणि प्रा. डॉ. रोहिदास गवारे यांनी काम पाहिले. या यशाबद्दल महाविद्यालयात निशा आणि मार्गदर्शकांचा सत्कार करण्यात आला.

राज्यातील १०० पर्यटन सबसर्किटच्या निर्मितीसाठी भागधारकांशी चर्चा

पर्यटन सबसर्किटची निवड, पर्यटनस्थळांचे वर्गीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासाबाबत विविध सूचना व शिफारसी प्राप्त

लोकशाही न्यूज नेटवर्क
मुंबई ✍ प्रतिनिधी

विकसित महाराष्ट्र या संकल्पनेअंतर्गत महाराष्ट्र राज्याला जागतिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने राज्यात १०० पर्यटन सबसर्किट विकसित करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाच्या अनुषंगाने मा.पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्तावित पर्यटन सबसर्किटची यादी अंतिम करण्यापूर्वी पर्यटन क्षेत्रातील विविध भागधारकांच्या सूचना, अभिप्राय व शिफारसी जाणून घेण्यासाठी पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने पर्यटन संचालनालयाच्या कार्यालयात विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. पर्यटन संचालनालयाचे संचालक श्री. विकास पानसरे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत पर्यटन क्षेत्रातील विविध भागधारक, पर्यटन व्यावसायिक, संबंधित संस्था व प्रतिनिधींनी प्रत्यक्ष तसेच ऑनलाइन प्रणालीद्वारे सहभाग नोंदविला. यावेळी प्रस्तावित पर्यटन सबसर्किटची निवड, पर्यटनस्थळांचे



भौगोलिक व विषयाधारित वर्गीकरण, पर्यटन विकासाच्या संभाव्य संधी, पर्यटकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, कनेक्टिव्हिटी, पर्यटनस्थळांची उपलब्धता तसेच स्थानिक स्तरावर पर्यटनाला चालना देण्याच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीदरम्यान सहभागी भागधारकांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पर्यटनस्थळे, पर्यटनाची वैशिष्ट्ये, नव्या पर्यटन संधी तसेच पर्यटन विकासासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण सूचना व शिफारसी मांडल्या. या सूचनांच्या आधारे प्रस्तावित पर्यटन सबसर्किट अधिक सर्वसमावेशक, व्यवहार्य आणि पर्यटकाभिमुख करण्याबाबत विचारविनिमय करण्यात आला. तसेच स्थानिक पर्यटन संसाधनांचा प्रभावी वापर, पर्यटनस्थळांम धील परस्पर जोडणी आणि स्थानिक रोजगार व आर्थिक विकासाला चालना देण्याच्या दृष्टीनेही चर्चा करण्यात आली. या बैठकीतून प्राप्त झालेल्या सूचना व शिफारसींचे संकलन व परीक्षण करून प्रस्तावित १०० पर्यटन सबसर्किटच्या अंतिम आराखड्याच्या निर्मितीसाठी त्यांचा विचार करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून राज्यातील पर्यटनस्थळांचा नियोजनबद्ध विकास, पर्यटन पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, पर्यटकांचा अनुभव अधिक समृद्ध करणे तसेच स्थानिक समुदायांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. विकसित महाराष्ट्र च्या दिशेने महाराष्ट्रातील पर्यटन क्षेत्राला नियोजनबद्ध, शाश्वत आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्याच्या दृष्टीने १०० पर्यटन सबसर्किटचा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

शेळगाव बॅरेज पाणीपुरवठा योजनेस आवश्यक निधी द्या!



लोकशाही न्यूज नेटवर्क
पारोळा ✍ प्रतिनिधी

यावल शहरातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता शेळगाव बॅरेज येथून सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी म ागणी लोकनियुक्त नगराध्यक्ष छाया अतुल पाटील यांनी जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत यावल नगरपरिषदेच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येत असून, आतापर्यंत सुमारे ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम ासाठी निधीची आवश्यकता आहे. यावल शहराचा पाणीपुरवठा प्रामुख्याने हतनूर धरणावर अवलंबून आहे. मात्र, धरणातील उपलब्ध पाणीसाठा पाहता आगामी फेब्रुवारी महिन्यापासून पाण्याचे आवर्तन मिळण्याबाबत अनिश्चितता निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे उन्हाळ्यात शहराला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. या पार्श्वभूमीवर शेळगाव बॅरेज पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण झाल्यास शहराचा पाणीप्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल. त्यामुळे उर्वरित कामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासनाकडे सकारात्मक शिफारस करावी, अशी विनंती नगराध्यक्ष छाया पाटील यांनी निवेदनातून केली आहे.

पीक विमा योजनेला १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ

आमदार अमोल जावळे यांच्या पाठपुराव्याला यश

लोकशाही न्यूज नेटवर्क
यावल ✍ प्रतिनिधी

खरीप हंगाम २०२६ मधील पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आम दार अमोल जावळे यांनी कृषी विभागाच्या प्रधान सचिवांकडे मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला यश आले असून, पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी आता १५ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ मिळाली आहे.

यामुळे रावेर-यावलसह राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यंदा अपुऱ्या पावसामुळे राज्यातील अनेक भागांत



दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पीक विम्याचे संरक्षण मिळणे महत्त्वाचे असताना, डिजिटल क्रॉप सर्व्हे प्रणालीतील तांत्रिक अडचणी, गावांच्या नकाशांमधील त्रुटी, पीक पाहणीच्या नोंदी उपलब्ध नसणे तसेच सातबारा उताऱ्यावरील माहिती आणि ऑनलाइन प्रणालीतील तफावत यामुळे अनेक शेतकऱ्यांना पीक विम्याचे अर्ज भरताना अडचणी येत होत्या. पीक विमा अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ होती. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र शेतकरी अर्ज भरू शकले नसल्याने त्यांना योजनेपासून वंचित राहावे लागण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन आमदार अमोल जावळे यांनी २२ ऑक्टोबर रोजी कृषी विभागाच्या प्रधान सचिवांना निवेदन देत पीक विमा योजनेसह डिजिटल पीक पाहणी प्रक्रियेलाही मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. पीक विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी वाढीव मुदतीचा लाभ घेत आपले अर्ज १५ नोव्हेंबरपूर्वी भरून घ्यावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

आदिवासी समाजासाठी 'सेवा संकल्प अभियान' शिबिर



लोकशाही न्यूज नेटवर्क
यावल ✍ प्रतिनिधी

ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ एकाच ठिकाणी मिळावा, या उद्देशाने ३० ऑक्टोबर २०२६ रोजी यावल तालुक्यातील आसराबारी येथे 'सेवा संकल्प अभियानांतर्गत' विशेष लाभार्थी शिबिराचे आयोजन करण्यात आले. आम दार अमोल हरिभाऊ जावळे यांच्या निर्देशानुसार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, यावल यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. शिबिरात जातीचे दाखले, रेशनकार्ड, मनरेगा जॉबकार्ड, जन्म-मृत्यू दाखले, आरोग्य तपासणी, कृषी मार्गदर्शन आदी सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. आदिवासी विकास विभागामार्फत दोन बचत गटांसह तीन वैयक्तिक लाभार्थ्यांना योजनांचे लाभ देण्यात आले. म हसूल विभागाने १० लाभार्थ्यांना जातीचे दाखले, दोन जणांना उत्पन्न दाखले आणि एका लाभार्थ्याला संजय गांधी निराधार योजनेचा लाभ मिळवून दिला.

पुरवठा विभागामार्फत १४ लाभार्थ्यांना रेशनकार्ड वितरित करण्यात आले. ग्रामविकास व पंचायत राज विभागाने ३० मनरेगा जॉबकार्ड, १० जन्मदाखले तसेच एका मृत्यू दाखल्यासंदर्भातील सेवा उपलब्ध करून दिली. भूमिअभिलेख कार्यालयाने १२ लाभार्थ्यांना मार्गदर्शन केले. कृषी विभागाने २५ महिला शेतकऱ्यांना महिला शेतकरी योजनांची माहिती, तर ३० लाभार्थ्यांना सेंद्रिय शेती व खेती बचाव योजनेबाबत मार्गदर्शन केले. सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे १६ लाभार्थ्यांना गोल्डन आभा कार्ड व नऊ लाभार्थ्यांना आभा कार्डसंदर्भातील सेवा देण्यात आली. शिबिराला फैजपूर विभागाचे प्रांताधिकारी बबनराव काकडे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार, यावलच्या तहसीलदार मोहनमाला नाझिरकर, यावल एसटी बस आगाराचे व्यवस्थापक इमरान पठाण, यावल कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती व संचालक हर्षल पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर अप्पा सोनवणे, परसाडे गावाच्या सरपंच मीना तडवी, भाजपचे तालुकाध्यक्ष सागर कोळी आणि जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सविता भालेराव यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

घर साफसफाईच्या बहाण्याने दागिने लंपास

मुंबई – दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घराची साफसफाई करण्यासाठी ऑनलाईन होम क्लिनिंग ॲपद्वारे सेवा घेणे मुंबईतील मालाड परिसरातील एका ५२ वर्षीय महिलेला महागात पडले. साफसफाईच्या बहाण्याने घरात आलेल्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी बेडरूममधील कपाटातून तब्बल १२ लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली.

थाळीफेक स्पर्धेत रणवीर पाटीलची राज्यस्तरावर निवड

लोकशाही न्यूज नेटवर्क
भातखंडे ✍ प्रतिनिधी



कर्मवीर तात्यासाहेब हरि रावजी पाटील किसान शिक्षण संस्था, भडगाव संचलित सौ. साधनाताई प्रतापराव पाटील माध्यमिक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, आमडदे येथील इयत्ता अकरावी विज्ञान शाखेचा विद्यार्थी रणवीर शरद पाटील (साहेबराव रंगराव पाटील नरवाडकर यांचे नातू) याने विभागस्तरीय मैदानी स्पर्धेतील थाळीफेक प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला.

या यशामुळे त्याची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड झाली आहे. त्याला क्रीडा शिक्षक व्ही. बी. पवार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन तथा जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रतापराव पाटील, उपाध्यक्ष तथा जळगाव जिल्हा दूध संघाच्या संचालिका डॉ. पुनम पाटील, सचिव प्रशांतराव पाटील, विद्यालयाचे प्राचार्य एन. जी. पाटील, पर्यवेक्षक वाय. एम. देसले आणि संजू सूर्यवंशी यांनी रणवीरचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

फुलगाव गोळीबार; सात ते आठ अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल

लोखंडी रॉड, लाकडी दांड्याने मारहाण; गावठी कट्ट्यातून दोन गोळ्या झाडून हल्लेखोर फरार

लोकशाही न्यूज नेटवर्क
वरणगाव ✍ प्रतिनिधी

शहराजवळील फुलगाव उड्डाणपुलाखाली मुक्ताईनगर येथील एका तरुणावर सात ते आठ अज्ञात हल्लेखोरांनी लोखंडी रॉड, लाकडी दांड्याने मारहाण करून गावठी कट्ट्यातून दोन गोळ्या झाडल्याची धक्कादायक घटना घडली. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून, याप्रकरणी सात ते आठ अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हल्लेखोरांचा शोध वरणगाव पोलीस घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सरफराज सैय्यद सकीर सैय्यद (वय २४, रा. काझीपुरा, मुक्ताईनगर) हा भुसावळ येथील एका खासगी कंपनीत चालक म्हणून कामाला आहे. सुमारे महिनाभरापूर्वी इन्स्टाग्रामच्या माध्यम ातून त्याची वरणगाव येथील अश्विनी नावाच्या मुलीशी ओळख झाली होती. १ नोव्हेंबर रोजी दोघांचे म ोबाईलवर बोलणे झाल्यानंतर फुलगाव उड्डाणपुलाखाली भेटण्याचे ठरले होते. त्यानुसार कामावरून घरी जात असताना सरफराज उड्डाणपुलाखाली थांबला होता. त्याचवेळी सात ते आठ अज्ञात हल्लेखोर तेथे आले. त्यातील एकाने पाठीमागून लोखंडी रॉडने त्याच्या डोक्यावर जोरदार प्रहार केला. त्यामुळे तो जमिनीवर कोसळला. त्यानंतर इतर हल्लेखोरांनी लोखंडी रॉड आणि लाकडी दांड्याने त्याच्या हातापायांवर मारहाण केली. याचवेळी एका हल्लेखोराने गावठी कट्ट्यातून दोन गोळ्या झाडल्या. त्यातील एक गोळी सरफराजच्या डाव्या खांद्यावर, तर दुसरी पोटात लागली. गंभीर जखमी अवस्थेत त्याला सोडून सर्व हल्लेखोर घटनास्थळावरून पसार झाले. जखमी सरफराजला प्रथम वरणगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी जळगाव येथील जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात हलविण्यात आले. त्याची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. याप्रकरणी जखमी सरफराज याने जळगाव पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून सात ते आठ अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ (१), ११८ (२), १८९ (४) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ च्या कलम ३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा तपास सुरू असून, हल्लेखोरांचा शोध घेण्यासाठी पोलीस प्रयत्नशील आहेत.

हरेश्वर वाचनालयात पटेल जयंती व इंदिरा गांधी पुण्यतिथी

लोकशाही न्यूज नेटवर्क
पिंपळगाव हरे. ✍ प्रतिनिधी

येथील हरेश्वर वाचनालयात ३१ ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती आणि भारताच्या माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भिका गुरुजी होते.

व्यासपीठावर वाचनालयाचे अध्यक्ष संजय पाटील, चिटणीस डॉ. वीरपालसिंग देशमुख, रवी गीते, यशवंत पाटील, देविदास महाजन, गीते सर, अर्जुन जाधव, बी. आर. महाजन, एस. एस. पाटील व पी. ओ. चौधरी उपस्थित होते. डॉ.



वीरपालसिंग देशमुख यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्याची माहिती दिली. एनएसयूआय महाराष्ट्राच्या प्रदेश उपाध्यक्ष श्वेता पाटील यांनी दोन्ही नेत्यांच्या कार्याचा आढावा घेतला. वाचनालयाचे सदस्य प्रकाश चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी मिलिंद देव, राजू सपकाळ, प्रकाश चव्हाण, अनंत पाटील, विलास गीते, राजू ठाकूर, प्रतिभा वाघ, अंतिम महाजन, संदीप पाटील, मदने गुरुजी, अशोक पाटील, शांताराम चौधरी यांच्यासह गावातील मान्यवर व वाचनप्रेमी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी ग्रंथपाल मि लिंद पाटील, सहाय्यक ग्रंथपाल गौरव पाटील, बापू सपकाळ व सुनील सावळे यांनी परिश्रम घेतले. आभार प्रतिभाताई वाघ यांनी मानले.

वरणगाव आयुध निर्माणी वसाहतीत सरदार पटेल जयंती उत्साहात साजरी

लोकशाही न्यूज नेटवर्क
वरणगाव ✍ प्रतिनिधी

आयुध निर्माणी वसाहतीम धील विठ्ठल मंदिर परिसरात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता आणि सर्वधर्म समभावाचा संदेश देण्यासाठी २९ व ३० ऑक्टोबर रोजी खान्देश फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. या फेस्टिव्हलमध्ये जळगाव जिल्ह्यातील विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने भरीत-पुरी, कळण्याची भाकरी, ठेचा, वडापाव, पावभाजी आदी खाद्यपदार्थांचा समावेश होता. मोबाईल आणि टीव्हीमध्ये व्यस्त असलेल्या नागरिकांनीही आपला वेळ काढून या फूड फ स्टिव्हलला भेट दिली आणि विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. यामुळे अनेकांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता. वसाहतीतील नागरिकांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दरम्यान, ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी संपूर्ण वसाहतीत सरदार वल्लभभाई पटेल यांच्या तैलचित्राची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.

या मिरवणुकीत वसाहतीतील महिला, पुरुष तसेच लहान बालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. राष्ट्रीय एकता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देणाऱ्या या कार्यक्रमामुळे वसाहतीत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धनेश्वर चौधरी, योगेश बोरोले, दीपक पाटील, अजय पाटील, प्रवीण पाटील, गणेश बऱ्हाटे, अतुल झोपे, रोशन भारंबे, स्वप्निल किरंगे यांच्यासह सर्व समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

एरंडोलमध्ये सरदार पटेल जयंती उत्साहात साजरी

लोकशाही न्यूज नेटवर्क
एरंडोल ✍ प्रतिनिधी



भारताचे लोहपुरुष, भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ओम नगर, सर्वो दय प्रतिष्ठान व गुजर समाज मंडळाच्या संयुक्त विद्यमाने विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात झाले. शहरातील नागरिक व तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सकाळी श्री ओंकारेश्वर महादेव मंदिराजवळ व सर्वोदय प्रतिष्ठान येथे सरदार पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी युवा शिवसेना जिल्हाप्रम ुख तथा गटनेते प्रा. मनोज पाटील, नगरसेवक रविंद्र महाजन, गोपाल शामू पाटील, प्रा. जी. आर. महाजन, डॉ. नरेंद्र डी. पाटील, माधव पाटील, सदाशिव पाटील, रामदास पाटील, दिनेश महाजन, ॲड. नितीन महाजन, विलास पाटील, भानुदास गुजर, कृष्णा महाजन, दिनेश पाटील व दीपक पाटील उपस्थित होते. सकाळी ८.३० वाजता सर्वोदय प्रतिष्ठान येथून भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात आली. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करीत रॅली गुजर मारोती मढी येथे पोहोचली. येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. व्यंगचित्रकलेतील योगदानाबद्दल शरद महाजन आणि सामाजिक कार्याबद्दल जितेंद्र पाटील यांचा सत्कार करण्यात आला. सायंकाळी जहांगीरपुरा येथील म हादेव मंदिरापासून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. प्रास्ताविक दिनेश महाजन, सूत्रसंचालन डॉ. नरेंद्र पाटील व आभार प्रा. जी. आर. महाजन यांनी मानले. कार्यक्रमासाठी चेतन पाटील, हेमंत महाजन, अनंत पाटील, भूषण पाटील, प्रथमेश पाटील, वैभव पाटील, दीपक पाटील, योगेश पाटील, मयूर पाटील, घनश्याम महाजन व गुरुदास चौधरी यांनी परिश्रम घेतले.

महत्वाचे

दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी पेन्शन अदालत

लोकशाही न्यूज नेटवर्क
जळगाव– जळगाव डाक विभागातील सेवानिवृत्त डाक कर्मचाऱ्यांच्या पेन्शनविषयक तक्रारींचे निराकरण करण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी सकाळी ११ वाजता डाक अधीक्षक, जळगाव विभाग यांच्या कार्यालयात विभागीय पेन्शन अदालत आयोजित करण्यात येणार आहे. पेन्शनविषयक ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नाही किंवा ज्याबाबत सम ाधानकारक उत्तर मिळालेले नाही, अशा तक्रारींचा पेन्शन अदालतमध्ये विचार करण्यात येईल. यामध्ये टपाल विभागातून सेवानिवृत्त झालेल्या तसेच सेवेत असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीवेतनधारकांच्या तक्रारींचा समावेश असेल. मात्र, वारस हक्कासारखी वैयक्तिक कायदेशीर प्रकरणे तसेच धोरणविषयक सूचना व तक्रारींचा पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाणार नाही. संबंधित पेन्शनधारकांनी आपल्या तक्रारी डाक अधीक्षक, जळगाव विभाग, जळगाव ४२५००१ या पत्त्यावर दर महिन्याच्या पहिल्या गुरुवारपर्यंत किंवा त्यापूर्वी पाठवाव्यात. पहिल्या गुरुवारनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा संबंधित महिन्याच्या पेन्शन अदालतमध्ये विचार केला जाणार नाही. तरी पात्र पेन्शनधारकांनी आपल्या तक्रारी विहित मुदतीत सादर कराव्यात, असे आवाहन जळगाव डाक विभागातर्फे करण्यात आले आहे.

रिक्षा. मोटरसायकलची धडक : युवक जखमी

लोकशाही न्यूज नेटवर्क
अमळनेर – रिक्षा आणि मोटरसायकलची समोरासमोर धडक झाल्याने चोपडा तालुक्यातील अनवर्दे येथील तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना अमळनेर धुळे रस्त्यावर मंगरुळच्या पुढे ३१ रोजी सायंकाळी ६ वाजता घडली. विलास यशवंत पाटील रा अनवर्दे ता चोपडा हा आपल्या मोटरसायकल क्रमांक एम एच १८, ई एस १४९ ने धुळ्याकडे जाताना समोरून धुळ्याकडून अमळनेर येणाऱ्या एका बिनानंबरच्या रिक्षाशी समोरासमोर धडक झाल्याने म ोटरसायकलस्वार जोरात फेकला जाऊन त्याच्या कपाळाला मार लागला. प्रचंड रक्तस्राव झाला. घटनेचे वृत्त कळताच हेडकॉन्स्टेबल काशिनाथ पाटील व सागर साळुंखे यांनी भेट दिली. जखमी विलास याला १०८ ने अमळनेर ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले व प्रकृती गंभीर असल्याने त्याला धुळे येथे रवाना करण्यात आले.

विवाहितेचा संशयास्पद मृत्यू

लोकशाही न्यूज नेटवर्क
पुणे – पुण्यातील मुकुंदनगर परिसरात एका विवाहितेचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. पायल अक्षय झांबरे असे मृत महिलेचे नाव असून, सासरच्या मंडळींकडून हुंडा आणि सोन्याच्या मागणीसाठी तिचा शारीरिक व मानसिक छळ केला जात असल्याचा गंभीर आरोप माहेरच्या कुटुंबीयांनी केला आहे. मुकुंदनगर येथील अक्षय हाइट्स सोसायटीतील जुन्या फ्लॅटमध्ये सोमवारी पायल यांचा मृतदेह छताच्या पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला.